३३

# शब्दवेध

जानेवारी २००८ । अंक : ३३




# शब्दवेध ३३

जानेवारी - मे २००८

अंक - तेहेतीस

- **संपादक** : दा. गो. काळे
- **कार्यकारी संपादक** : दिनकर मनवर
- **सोबत** : मंगेश नारायणराव काळे, दिनकर दाभाडे, प्रकाश नागोलकर, राजेंद्रबापू पाटील, अनिल राजपूत, गजानन मुदलीयार

**या अंकात –**


**लेख :**

**मनोहर ओक यांची कविता** - रणधीर शिंदे – १५

**अनवट सुरावटीची कविता** - दा. गो. काळे – २१

**एकांगी कविता** - वैजयंतीमाला जाधव – २५

**एक मनस्वी चित्रकार : सुधीर पटवर्धन** - राजेंद्र – ३

**कांदाचिर : बांधिलकीच्या अभिरूचीचा मूल्यसंघर्ष**- महेंद्र कदम – ५३

**आधुनिक समीक्षा सिद्धांत-विषयी** - गजानन अपिने – ५९

**कादंबरी अंश :**

**व्हाया सावरगाव खुर्द।।** - दिनकर दाभाडे – ४५

**कविता :**

**अट्ठावीस कविता** - मनोहर ओक – ५

**दहा कविता** - श्रीधर पवार – २७

**दोन कविता** - आनंद विंगकर – ३९



- **मुखपृष्ठ** : सुधीर पटवर्धन
- **रेखाटने** : एम. के.
- **मुद्रण** : क्रांती एजन्सीज, पुणे
- **मुद्रित शोधन** : मोहन शिरसाट
- या अंकाचे देणगी मूल्य ५०/- रु.




- **पत्रव्यवहार** : दा. गो. काळे. संपादक, शब्दवेध, रोकडिया नगर, शेगाव, जि. बुलढाणा - ४४४ २०३.

☎ (०७२६५) २५४५११ भ्रमणध्वनी : ९४२१४६७६४०



हा अंक मुद्रक, प्रकाशक, संपादक, दा. गो. काळे यांनी क्रांती एजन्सीज, कसबा पेठ, पुणे - ११ येथे छापून शब्दवेध प्रतिष्ठान, शेगाव येथे खाजगी वितरणासाठी प्रसिद्ध केला.

# 'आधुनिक समीक्षा-सिध्दांत' विषयी



गजानन अपिने

१.

मिलिंद मालशे आणि अशोक जोशी या लेखक द्वयाने लिहिलेला 'आधुनिक समीक्षा-सिद्धान्त' हा ग्रंथ मराठी साहित्य क्षेत्रातील एक मौलिक ग्रंथ म्हणून अधोरेखित करावा लागेल. या ग्रंथापूर्वी हे दोनही लेखक मराठी वाचकाला निरनिराळ्या नियतकालिकांतून, मासिकातून, संपादित ग्रंथातून केलेल्या लेखनाने आणि स्वतंत्र ग्रंथरचना करणारे लेखक या नात्याने परिचित आहेत. या लेखकद्वयांच्या परिचयाचा आणखी एक पैलू म्हणजे 'अनुवादकार' हा होय. आर. जी. कॉलिंगवुड यांच्या 'The Principles of Art' या ग्रंथाचे 'कलेची मूलतत्वे' या नावाने मिलिंद मालशे यांनी केलेला अनुवाद, आणि जॉन विलेट यांनी संपादित केलेल्या Brecht on Theater या ग्रंथाचा 'ब्रेख्तचे नाट्यविचार' या नावाने अशोक जोशी यांनी केलेला अनुवाद, हे लक्षणीय आहेत.

प्रस्तुत 'आधुनिक समीक्षा-सिद्धांत' हा ग्रंथ गेल्या शंभर वर्षातील वैचारिक विश्वात मांडल्या गेलेल्या प्रमुख सिद्धान्तव्युहांचा, संकल्पनांचा आढावा घेणारा, परामार्श करणारा, एवढेच नव्हे तर तटस्थ राहून चिकित्सा करणारा असा उतरला आहे. विसाव्या शतकात उदयाला आलेल्या, चर्चिल्या गेलेल्या संकल्पनांचा, सिद्धान्तव्युहांचा फार मोठा परिणाम हा साहित्य-समीक्षा व्यवहारावरती झाला आहे. इतकेच नव्हे तर अशा सिद्धान्तव्युहाच्या पुष्ट्यर्थ तर कधी प्रतिवाद करण्यासाठी झालेल्या लेखनातून नव्या भूमिकांची बीजे पेरली गेली. उदा. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात रूपवादाच्या चर्चेला सुरूवात झाली. पुढे १९६० पर्यंतच्या कालखंडात रूपवादाविषयी निरनिराळ्या तऱ्हेने उलटसुलट चर्चा सुरू राहिली. नंतरच्या काळात भाषाविज्ञान या ज्ञानक्षेत्रात झालेले नवे संशोधन आणि आधुनिक अभ्यास पद्धतींच्यामुळे भाषाविज्ञानविषयीच्या नव्या संकल्पनांचा जन्म झाला. याचा परिणाम भाषा, समाज, संस्कृती, इतिहास इत्यादी अभ्यासविषयांच्या संदर्भात विविधांगाने मांडणी होवू लागली. या सगळ्या चर्चेच्या पाठीमागे या पूर्वीच्या सिद्धान्तव्युहातील कच्चे दुवे हेरण्याची अथवा त्या पूणार्थी समाधानकारक नाही आहेत, अशीसुद्धा जाणीव स्पष्टपणे असल्याचे दिसते. या सगळ्या प्रक्रियेतली दुसरी बाजू म्हणजे यातून कलाविषयक, समीक्षेविषयक, समाजविषयक, वाचकविषयक

नवनव्या सिद्धांत आणि तत्वव्युहांच्या चर्चेला जागा निर्माण झाली. त्याविषयक अनेक शक्यता सुचविल्या गेल्या. याचा परिणाम "चिन्हात्मकता, विकेंद्रितता, सांस्कृतिक भौतिकवाद, लिंगभेद, अर्थनिर्णयन, संभाषित संहितात्मकता, यासारख्या नव्या संकल्पनांच्या व तत्त्वांच्या आधारे विविध प्रकारचे नवे सिद्धान्त उदयाला आले." *('आधुनिक समीक्षा - सिद्धांत', मिलिंद मालशे/अशोक जोशी, मौज प्रका., प्रास्ताविक.)* आणि मग या नव्या सिद्धान्ताचे, संकल्पनांचे स्वरुप स्पष्ट करणे. त्याविषयीचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय संदर्भ शोधणे. तटस्थ राहून समग्रपणे या सिद्धान्ताची चिकित्सा करणे, अन्य ज्ञानविषय/अभ्यासक्षेत्रांशी असलेला त्यांचा अनुबंध स्पष्ट करणे, इतकेच नव्हे तर उपयोजिततेच्या पातळीवरती त्यासंबंधीच्या निरनिराळ्या शक्यता स्पष्ट करणे, ह्या प्रमुख भूमिकेतून 'आधुनिक समीक्षा-सिद्धांत' या ग्रंथाची निर्मिती झाली आहे.

मुख्यत्वे मिखाईल बाख्तिन, सोस्यूर, फ्राईड, नीत्शे, याकबसन, लेवी-स्ट्राउस, बार्थ, मार्क्स, हेगेल, कार्ल युंग, लाकां, ल्योतार, जेमसन, हावरमास तत्त्ववेत्यांच्या सिद्धान्तव्युहांचा असाधारण असा परिणाम गेल्या शतकावरती पडलेला आहे. हा परिणाम साहित्य-समीक्षा इतकेच नव्हे तर अन्य कला आणि ज्ञानशाखांच्या अभ्यासावरतीही झाला आहे. शिवाय उत्तरोत्तर त्यांचे महत्त्व वाढते आहे. त्यांच्या मांडणीतील मूल्यात्मकता ठळक होती आहे. या पार्श्वभूमीवरती प्रस्तूत ग्रंथाचे महत्त्व सिद्ध होते. एकूणच साहित्य समीक्षेच्या बाबतीत तात्विक चिंतन/लेखन हे साहित्य संस्कृतीच्या विकासाला दिशा देणारे, त्याच्या कक्षा रुंदावणारे ठरत असते. यावेळी मग त्याविषयीच्या चिकित्सेला, मूल्यमापनालाही तितकेच महत्त्व येत असते. याचा विचार करता नवनवीन सिद्धान्त, संकल्पनांचा परिचय घडवून आणणारे, एकाचवेळी ओळख करून देण्याचा परिघ ओलांडून चिकित्सेच्या पातळीवर जात त्यातील बलस्थान-कच्चेदुवे हेरणारा हा ग्रंथ महत्वाचा ठरतो. विशेषत: हे सर्व करताना काही सिद्धान्ताची *(उदा. मार्क्सवाद, मनोविश्लेषण इ.)* पुनर्मांडणी करून घेतली आहे. शिवाय त्या काळातील संबंधित सिद्धान्ताच्या मांडणीनंतर आज त्याविषयीची प्रस्तुतता आणि त्या सिद्धान्ताविषयीच्या भाष्यकारांनी सिद्धान्ताला पुढे नेताना केलेली मांडणी याचाही परामर्श घेतल्याने 'आधुनिक समीक्षा-सिद्धान्त' या ग्रंथाच्या कक्षा रुंदावल्या गेल्या आहेत.

# २.

मराठी समीक्षालेखनाच्या प्रवाहाचा विचार करता बा.सी.मर्ढेकर, रा.भा. पाटणकर, सुधीर रसाळ, गंगाधर पाटील, म.सु. पाटील, हरिश्चंद्र थोरात, वसंत पाटणकर यासारख्या मोजक्याच संशोधक समीक्षकांनी पाश्चात्य समीक्षा-सिद्धान्ताविषयी मीमांसा करणारे असे लेखन केले आहे. अशा स्वरुपाच्या लेखनाचे महत्त्व यासाठी की, अशी चर्चा/लेखन ही साहित्यासंबंधीच्या विश्लेषणाला आवश्यक असलेली 'थिअरी' पुरवत असते. अशा 'थिअरी'च्या आधारे केलेले भाष्य हे तर्कसुसंगत उतरत असते. शिवाय अशा स्वरुपाच्या 'थेअरी'च्या उजेडात साहित्यासंबंधी (अथवा अन्य कलांसंबंधी) होणारी चर्चा ही साहित्यनिर्मिती आणि साहित्यसमीक्षा अशा दोन्ही स्वरुपाच्या लेखनाला गती देणारी ठरते, असे म्हणता येईल.

तसेच कोणत्याही सिद्धान्त, संकल्पना, तत्त्वव्युहाची घडण/मांडणी ही एखाद्या सामाजिक-सांस्कृतिक संदर्भात, त्या काळातील वैचारिक वातावरणाच्या पार्श्वभूमीवर होत असते. असे असले तरी संबंधित सिद्धान्त हे त्याच काळाला, संदर्भाला बांधिल नसतात तर त्यातील तत्त्वव्युह हे कला, साहित्य, संस्कृतीच्या अन्वयार्थासाठी त्या काळाच्या नंतरही उपयोगी ठरतात. "कोणताही सिद्धान्तव्युह देशकालाच्या मर्यादा ओलांडत प्रवास करू शकतो, बऱ्याच कालानंतर पुन्हा उपयोगी पडू शकतो या अर्थाने तो कालबाह्य होत नाही." *(साहित्याचे संदर्भ, हरिश्चंद्र थोरात, मौज प्रका., पृ.११२.)* शिवाय नव्या काळातील भाष्यकार कधी-कधी त्या सिद्धान्तातील विचाराला पुढेही नेत असतात, त्याच्या आधारे नव्या शक्यताही शोधत असतात. त्यामुळे नव्या सामाजिक-सांस्कृतिक संदर्भात, काळातही त्याविषयीची चर्चा/चिकित्सा/मूल्यमापन ही साहित्य-संस्कृतीच्या अनुषंगाने महत्त्वाची ठरत असते. या अंगानेही 'आधुनिक समीक्षा-सिद्धान्त' या ग्रंथाचे मूल्य सिद्ध होते. असेही स्वरुप प्राप्त झाले आहे. एखादी ग्रंथरचना अस्सल, अर्थपूर्ण आणि संदर्भसंपृक्त असेल तर ती ग्रंथलेखकाच्या अपेक्षेच्या परिघाबाहेर जात अपेक्षेपेक्षा चांगली होण्याची शक्यता असते. असेच काहीसे या ग्रंथाचे झाले आहे.

आधुनिक समीक्षा-सिद्धान्ताविषयी सांगोपांग चर्चा करता लेखनाच्या ओघात आवश्यक तिथे साहित्य, समीक्षा, संस्कृती, लेखक, वाचक, आस्वाद, समाज, सौंदर्यशास्त्र

इत्यादीविषयी अभ्यासपूर्ण, संशोधनपूर्ण विधान/टिप्पणी येतात. उदा.

१) "आस्वाद वा रसग्रहण आणि समीक्षा वा मूल्यन या प्रक्रिया परस्परावलंबी आहेत, या गोष्टीचे भान मराठी समीक्षेमध्ये फारसे नाही. आस्वादासाठी वा रसग्रहणासाठी एखाद्या साहित्याकृतीची वा लेखकाची निवड करणे यात एक गर्भित मूल्यन असतेच, आणि मूल्यन हे यादृच्छिक (arbitrary) व्हायला नको असेल, तर ते वस्तुनिष्ठ निकषांवर आधारून करावे लागते. तेव्हा गर्भित तत्त्वांचे व निकषांचे भान समीक्षेला असणे आवश्यक आहे." *('आधुनिक समीक्षा-सिद्धंत', उनि. पृ.४)*

२) "साहित्य ही गोष्ट केवळ रंजनासाठी नसून ती मननीय, चिंतनीय, अभ्यासनीय असते, तिला व्यापक सांस्कृतिक जीवनाचा पाया असतो, हेही लक्षात ठेवले पाहिजे." (पृ.४)

३) "आधुनिकिकरणाच्या प्रक्रिया या मानवकेंद्री व व्यक्तिकेंद्री असल्या तरी त्या समाज-संस्कृति-सापेक्षेही असतात. हे ध्यानात घ्यायला हवे." (पृ.२३७)

४) "प्रत्येक मानवी समाज उपलब्ध असणाऱ्या ध्वनींवर संरचनात्मक प्रक्रिया करून त्यांना अर्थपूर्ण व्यवहारासाठी वापरत असतो, आणि या प्रक्रियेमधूनच त्या समाजाची विशिष्ट बोली घडलेली असते." (पृ.११४)

प्रस्तूत ग्रंथात अशा भरपूर विधानांना अधोरेखित करता येईल की, ज्याच्या आधारे मिलिंद मालशे आणि अशोक जोशी या लेखकांच्या चिंतनशीलतेचे दर्शन घडते.

बहुतेकदा अशा स्वरुपाच्या लेखनात मूळ लेखन आणि त्याचे कर्ते यांच्यावर भारावून लिहिण्याची शक्यता असते. परंतु मालशे आणि जोशी यांनी या ग्रंथात जितक्या ताकदीने सिद्धान्तव्युहातील, संकल्पनातील बलस्थान हेरलेली आहेत तितक्याच अभ्यासपुर्णतेने संबंधित मांडणीतील, तत्त्वव्युहातील कच्चे दुवेही विशद केले आहेत. उदा. "काही बाबतीत ही वाचने मर्मग्राही आहेत यात शंकाच नाही. खरे म्हणजे या प्रकारची सूक्ष्म वाचनावर आधारलेली समीक्षा हे अंग्लो-अमेरिकन नव-समीक्षेचे बलस्थान म्हणायला हवे. परंतु या संपूर्ण समीक्षाव्यवहारामध्ये साहित्याचे एकसत्त्वीकरण झालेले आहे, ही त्याची मोठीच मर्यादा म्हणायला हवी. त्यामुळे हाती घेतलेल्या साऱ्याच साहित्यकृती एकाच प्रकारच्या आहेत की काय असे वाटू लागते."(पृ.८७) कोणत्याही एकाच एक विचारसरणीचा, भूमिकेचा पुरस्कार किंवा टीका असे लेखन संपूर्ण ग्रंथात कोठेच आढळत नाही. या सगळ्यात त्यांची तटस्थ राहून चिकित्सा करणारी वृत्ती पुन्हा पुन्हा आधोरेखित होते. या काळातील आधुनिक सिद्धान्तव्युहांचा आलेख मांडताना लेखकद्वयांनी "प्रत्येक डोळ्यासमोर ठेवलेले आहे." (पृ.२०) एकूणच तटस्थपणे केलेली मीमांसा, त्याआधारे हाती आलेल्या निष्कर्षाची संयमाने केलेली मांडणी आणि या सगळ्याचा अन्वयार्थ लावण्याचा, त्यातील प्रस्तूतता शोधण्याचा/तपासण्याचा केलेला प्रयत्न यामुळे 'आधुनिक समीक्षा-सिद्धान्त' या ग्रंथाला अथपासून इतिपर्यंत एक प्रकारची सखोलता प्राप्त झाली आहे.

## ३.

साहित्यासंबंधीच्या सिध्दान्तरचना, समीक्षालेखन, यांच्या कक्षा वेगवेगळ्या ज्ञानशाखांच्या, अभ्यासक्षेत्रांच्या कक्षांना भिडलेल्या आहेत. त्यामुळे प्रस्तुत ग्रंथात लेखकद्वयानी सिद्धान्तव्युहाविषयी भाष्य करताना संदर्भानुसार संबंधित सिद्धांन्तांचा निरनिराळ्या ज्ञानक्षेत्राशी असलेल्या नातेसंबंधावरही भाष्य केले आहे. म्हणजे या ग्रंथात झालेली चर्चा ही तत्त्वज्ञान, इतिहास, मानववंशशास्त्र, संगीत, मानसशास्त्र, भाषाविज्ञान, सौदर्यशास्त्र, साहित्यशास्त्र ह्या अभ्यासक्षेत्रांना स्पर्श करत जाते. याचा परिणाम ह्या आधुनिक समीक्षा सिद्धान्तातील महत्त्वपूर्ण दिशांचा परिचय घडण्यातही मदत झाली आहे.

संपूर्ण ग्रंथात सिद्धान्तव्युहांची, त्यावरील चिकित्सेची त्यातील गुणदोषासह झालेली साक्षेपी मांडणी आणि शक्य तिथे या सगळ्याचा मराठी साहित्य-समीक्षेशी असणारा अनुबंध *(आस्वादक समीक्षा पृ.१४०, मराठीतील विश्लेषक मूल्यात्मक समीक्षा पृ.१७, भारतीय अविष्कार पृ.४३, उपयोजित समीक्षा पृ.२३१, उपयोजन : एक उदाहरण पृ.२३८, या शीर्षकाखाली अभ्यासपूर्ण सखोल विवेचनातून घेतलेली नोंद इ.)* जोडून दाखविल्याने संपूर्ण विवेचनाला महत्त्व प्राप्त झाले आहे. संपूर्ण ग्रंथात प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी आलेले विस्तृत मराठी, इंग्रजीतील टिपालेखन हे 'आधुनिक समीक्षा - सिद्धान्त' मधील विवेचन/विश्लेषणाच्या कक्षा रुंदावण्यास आणि ग्रंथातील लेखनास मूल्यात्मकतेच्या दिशेला खेचण्यास मदत करतात. एकूणच या सगळ्यांचा विचार करता मिलिंद मालशे आणि अशोक जोशी या लेखकद्वयानी सिद्ध केलेला 'आधुनिक समीक्षासिद्धात' हा ग्रंथ मराठी समीक्षालेखन प्रवाहात स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करणारा ठरला आहे, असे म्हणता येईल.

□

## शब्दवेध सन्मान आणि निमंत्रित कवींचे कवितावाचन

**रविवार दि. १८ मे २००८** दुपारी १२.०० वाजता

### शब्दवेध सन्मान

**जी. के. ऐनापुरे** यांना यंदाचा शब्दवेध सन्मान - २००८

**ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके** यांच्या हस्ते देण्यात येणार आहे

यावेळी प्रमुख अतिथी आहेत

**सतीश तांबे** (मुंबई), **डॉ. जयंत गाडगीळ** (पुणे), **डॉ. दिवाकर कृष्ण आचार्य** (अकोला)

### कवितावाचन **संध्याकाळी ५.०० वाजता**

वसंत आबाजी डहाके, हेमंत दिवटे, लोकनाथ यशवंत, दासू वैद्य, सलील वाघ, प्रकाश होळकर, किशोर कदम, रमेश इंगळे उत्रादकर, रविंद्र इंगळे चावरेकर, सुखदेव ढाणके, देविदास चौधरी, अशोक कोतवाल. प्रविण बांदेकर, वीरधवल परब, संदीप देशपांडे, संतोष पद्माकर पवार, मनोज बोरगावकर, धनंजय चिंचोलीकर, भगवान ठग, अविनाश गायकवाड, उत्तम अंभोरे, देविदास कळसकर.

**निमंत्रक :**

दा. गो. काळे (संपादक, शब्दवेध)

दिनकर मनवर (कार्य. संपादक, शब्दवेध)

स्थळ : हॉटेल द्वारका, गजानन वाटिकेसमोर, खामगाव रोड, शेगाव, जि. बुलढाणा.


## पहिला 'कवी अरुण काळे पुरस्कार' प्राप्त कवितासंग्रह

**आशय प्रकाशनाचा नवा कविता संग्रह**



# अजूनही अस्वस्थ रोहिणी

**अविनाश गायकवाड**

पृष्ठे : ९६ मूल्य : १००/-

आशय प्रकाशन

ए/३०१, प्रमिला अपार्टमेंट

खारेगाव, कळवा (प.), ठाणे - ५.